दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ०५ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## जालना-बीड महामार्गावर दोन एसटी बसची समोरासमोर धडक

**जालना :** जालना-बीड महामार्गावर शनिवारी सकाळी भीषण अपघात झाला. अंबड तालुक्यातील शहापूरजवळ गल्हाटी नदीच्या पुलावर अंबड आगाराच्या दोन एसटी बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोन्ही बसचे चालकांसह सुमारे ३० ते ४० प्रवासी जखमी झाले असून, त्यामध्ये मोठ्या संख्येने शाळकरी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत बचावकार्य सुरू केले.

**पाहिजेत**

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.
कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.

## थोडक्यात वार्ता



**छत्रपती संभाजीनगर : स्मशान मारोतीपासून जालनारोड, सेवन हिलकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरूस्ती रखडल्याने पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याची चाळणी झाली आहे.**

### वयाच्या 116 व्या वर्षी पायऱ्या चढून तिरुमला गाठणाऱ्या आजीबाईंचे कौतुक



**हैदराबाद :** तिरुपती येथील भगवान श्री व्यंकटेश्वर स्वामींच्या दर्शनाची ओढ माणसाला कोणत्याही संकटावर किंवा वयावर मात करण्याची शक्ती देते, याचाच प्रत्यय आणून देणारी एक थक्क करणारी घटना समोर आली आहे. एका ११६ वर्षीय वृद्ध महिलेने केवळ दर्शनाच्या ओढीने तिरुमला डोंगराच्या पायऱ्या चढण्यास सुरुवात केली असून, त्यांना पाहून तेथील इतर भाविक आणि नेटीझन्स कमालीचे आश्चर्यचकित झाले आहेत.

### ताजमहाल की 'तेजो महालय'? वैज्ञानिक सर्वेक्षणासाठी याचिका दाखल!



**प्रयागराज :** आग्रा येथील जागतिक कीर्तीचा ताजमहाल हा प्रत्यक्षात 'तेजो महालय' नावाचे शिवमंदिर असल्याचा दावा करणाऱ्या प्रकरणात आता एक नवीन आणि महत्त्वपूर्ण वळण आले आहे. या संपूर्ण परिसरचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्यासाठी (सर्वे कमिशनर नियुक्त करण्यासाठी) आता थेट अलाहाबाद उच्च न्यायालयाचा दरवाजा खटखटावण्यात आला आहे. या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण याचिकेवर आगामी सोमवारी सुनावणी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ताजमहाल परिसराच्या सर्वेक्षणासाठी 'ॲडव्होकेट कमिशन' नियुक्त करण्याची मागणी आग्रा येथील जिल्हा न्यायालय आणि सिव्हिल जज (सीनियर डिव्हिजन) यांनी फेटाळून लावली होती. या कनिष्ठ न्यायालयांच्या निर्णयाला आव्हान देत उच्च न्यायालयात ही याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ताजमहाल परिसरात 'भगवान श्री अग्रेश्वर महादेव नागनाथेश्वर विराजमान तेजो महालय मंदिर' असल्याचा मुख्य दिवाणी खटला वर्ष २०१५ पासून आग्र्याच्या दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे. याचिकाकर्त्यांनी प्रलंबित मुख्य खटल्यात न्यायालयाला अशी विनंती केली आहे की, ताजमहालची सध्याची वास्तू ही प्रत्यक्षात एक प्राचीन शिवमंदिर (तेजो महालय) असल्याचे घोषित करण्यात यावे. याच खटल्याच्या सुनावणीदरम्यान भक्कम पुरावे गोळा करण्यासाठी संपूर्ण परिसराचे सर्वेक्षण करण्यात यावे, असा अर्ज न्यायालयात सादर करण्यात आला होता.

## पोह्यात आळी, भातात झुरळ; पीईएस कॉलेज कँटीनचा परवाना निलंबित

### विद्यार्थ्यांच्या तक्रारीनंतर अन्न सुरक्षा विभागाची धडक कारवाई; मुदतबाह्य साठा जागेवरच नष्ट, अनेक गंभीर त्रुटी उघड

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कँटीन चालकांविरुद्ध अन्न सुरक्षा विभागाने आता कडक पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. येथील नामांकित पीईएस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुलांच्या वसतिगृहातील कँटीनमध्ये पोह्यात आळी आणि भातात झुरळ आढळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्रस्त विद्यार्थ्यांनी या गंभीर प्रकाराचा व्हिडिओ बनवून थेट अन्न सुरक्षा विभागाकडे तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची तात्काळ दखल घेत अन्न सुरक्षा विभागाने संबंधित कँटीनवर अचानक धाड टाकली. या तपासणीत कँटीनमध्ये प्रचंड अस्वच्छता, मुदतबाह्य अन्नसाठा आणि अन्नपदार्थात खाद्यरंगाचा



बेकायदेशीर वापर होत असल्याचे उघड झाले. या सर्व गंभीर त्रुटींमुळे प्रशासनाने या कँटीनचा अन्न सुरक्षा परवाना तात्काळ निलंबित केला आहे. राज्यात सुरू असलेल्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत शुक्रवारी, ३ जुलै रोजी ही धडक कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त (अन्न) दयानंद पाटील यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे आणि कीर्तिका झाडे यांच्या पथकाने पीईएस कॉलेजच्या वसतिगृह कँटीनला अचानक भेट दिली. विद्यार्थ्यांनी दिलेल्या तक्रारीतील तथ्यांची पडताळणी करण्यासाठी हे पथक कँटीनच्या स्वयंपाकघरात पोहोचले असता, तेथील विदारक चित्र पाहून अधिकारीही थक्क झाले. संपूर्ण कँटीन परिसरात आणि स्वयंपाकघरात कमालीची अस्वच्छता पसरलेली होती, जी अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे सरळ-सरळ उल्लंघन करणारी होती. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी कँटीनच्या साठवणूक कक्षाची बारकाईने तपासणी केली असता, तिथे स्वयंपाकासाठी वापरले जाणारे विविध मसाले आणि इडली बनवण्यासाठी आणलेला रवा मुदतबाह्य (एक्सपायरी डेट संपलेला) अवस्थेत साठवून ठेवल्याचे आढळून आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकणारा हा संपूर्ण मुदतबाह्य अन्नसाठा अन्न सुरक्षा पथकाने जप्त करून जागेवरच नष्ट केला. याशिवाय, कँटीनमध्ये अन्नपदार्थ आकर्षक बनवण्यासाठी रासायनिक खाद्यरंगांचा सर्रास वापर केला जात असल्याचेही निदर्शनास आले, जे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकते. विद्यार्थ्यांनी पुराव्यांसह केलेल्या तक्रारीनंतर अन्न सुरक्षा विभागाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे कॉलेज वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. कँटीनमध्ये स्वच्छता आणि अन्न सुरक्षेच्या नियमांचे पुरते धिंडवडे निघाल्याचे स्पष्ट झाल्यामुळे, प्रशासनाने कोणतीही सवलत न देता कँटीनचा परवाना तात्काळ निलंबित केला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी आणि खाण्यापिण्याच्या दर्जाशी तडजोड करणारी कोणतीही हलगर्जीपणा सहन केली जाणार नाही, असा सज्जड इशारा या कारवाईच्या माध्यमातून अन्न सुरक्षा विभागाने शहरातील इतर शैक्षणिक संस्थांच्या कँटीन चालकांनाही दिला आहे.



**सरस्वती भुवन महाविद्यालय प्रवेशद्वारासमोर पावसाचे पाणी साचून तळे निर्माण झाल्याने वाहतूक विस्कळीत होत अपघातांस निमंत्रण मिळत आहे.**

## राजस्थानला गेलेल्या व्यापाऱ्याचे घर फुटले; 18.50 लाखांचा ऐवज लंपास

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** धार्मिक कार्यक्रमासाठी संपूर्ण कुटुंबासह राजस्थानला गेलेल्या शहरातील एका नामांकित सिमेंट आणि बांधकाम व्यावसायिकाच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आतील तब्बल १० तोळे सोन्याचे दागिने आणि साडेसात लाखांची रोकड असा एकूण १८ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

ही धाडसी चोरी २६ जून ते २ जुलै दरम्यान मोंढा रोडवरील सम्राट अशोक चौकातील लक्ष्मण चावडी भागात घडली. या मोठ्या घरफोडीमुळे परिसरात खळबळ उडाली असून, याप्रकरणी क्रांतीचौक पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## फर्दापूर बसस्थानकाजवळील पुलावर पावसाचे पाणी साचल्याने अपघातांचा धोका

हिंदू प्रकाशवार्ता /शेख हक्कानी

**फर्दापूर, दि. ४ :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणीकडे जाणाऱ्या जळगाव-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग (NH-753F) वरील फर्दापूर बसस्थानकाजवळील पुलाची दुरवस्था वाहनचालकांसह पादचाऱ्यांसाठीही धोकादायक ठरत आहे. चौपदरीकरणाचे काम पूर्ण होऊन तब्बल आठ वर्षे उलटूनही या पुलावर अद्याप डांबरीकरण करण्यात आलेले नसल्याने पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत असून अपघातांची मालिका सुरू आहे.

पुलावरील खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वार घसरून पडत आहेत. शनिवारीही एका दुचाकीस्वाराचा अपघात होऊन तो जखमी झाल्याची घटना घडली. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

याशिवाय पुलावर पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य निचऱ्याची व्यवस्था नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. साचलेल्या पाण्यातून अवजड वाहने गेल्यानंतर घाण पाणी दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या अंगावर उडत असून त्यांना मोठा



त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे या पुलावर नागरिकांना सुरक्षितपणे चालण्यासाठी पादचारी मार्ग (फुटपाथ) देखील उपलब्ध नाही. त्यामुळे पादचाऱ्यांना वाहनांच्या रहदारीतून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी पुलावर तातडीने पादचारी मार्गाची उभारणी करण्याची मागणी केली आहे.

जळगाव-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील इतर पुलांचे डांबरीकरण पूर्ण झाले असताना फर्दापूर बसस्थानकाजवळील पुलाकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी देश-विदेशातून हजारो पर्यटक याच मार्गाने प्रवास करतात. त्यामुळे या पुलाची तातडीने दुरुस्ती करून डांबरीकरण, पाणी निचऱ्याची व्यवस्था आणि पादचारी मार्गाचे काम पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

## उशिरा सुचलेले शहाणपण! उन्हाळ्यात झोपलेले प्रशासन पावसात जागे

हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणने ३० जूनपर्यंत विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करण्याचा अल्टिमेटम दिला होता. मात्र त्याकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केल्याने आता पावसाळा सुरू झाल्यानंतर महानगरपालिकेला रामनगर परिसरात धोकादायक फांद्यांची कटाई करावी लागत आहे. त्यामुळे "जी कामे उन्हाळ्यात व्हायला हवी होती, ती पावसाळ्यात का?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

रामनगर परिसरातील मोठ्या वृक्षांच्या फांद्या विद्युत तारांना स्पर्श करत असल्याने शॉर्टसर्किट, स्पार्किंग आणि वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका निर्माण झाला होता. अखेर शनिवारी महानगरपालिकेच्या पथकाने हायड्रॉलिक क्रेनच्या साहाय्याने झाडांच्या फांद्यांची छाटणी सुरू केली. पावसाच्या वातावरणात सुरू असलेल्या या कामामुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी एन-२ विठ्ठलनगर परिसरात झाडाची मोठी फांदी थेट विद्युत तारेवर कोसळली होती. त्यातून झालेल्या स्पार्किंगमुळे डीपीला आग लागली होती. डीपीभोवती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या झुडपांमुळे आग अधिक भडकली होती. सुदैवाने त्यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र मोठी दुर्घटना टळली होती. या घटनेनंतरही संबंधित विभागांनी वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या नाहीत, अशी नागरिकांची तक्रार आहे.

महावितरणने वेळेत सूचना देऊनही फांद्यांची छाटणी का झाली नाही, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. उन्हाळ्यात कोरड्या वातावरणात ही कामे सुरक्षितपणे पूर्ण होऊ शकली असती. मात्र आता पावसाळ्यात ओल्या वातावरणात विद्युत तारांजवळ काम करावे लागत असल्याने कर्मचाऱ्यांनाही अतिरिक्त धोका निर्माण झाला आहे.



## पिसादेवी येथे उघड्या डीपीचा शॉक लागून मजुराचा मृत्यू तीन चिमुकल्या झाल्या पोरक्या

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पिसादेवी रोड येथे वैशाली ढाबा परिसरात महावितरणच्या उघड्या अवस्थेतील डीपीमधून परिसरात उतरलेल्या विजेच्या प्रवाहाचा शॉक लागून ४० वर्षीय मजुराचा मृत्यू झाला. शनिवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर नातेवाईकांनी महावितरणच्या निष्काळजीपणाविरोधात संताप व्यक्त केला आहे. सुरेश कचरू साळवे (४०, रा. आंबेडकर नगर, एन-७) असे मृत मजुराचे नाव आहे. ते कामानिमित्त पिसादेवी शिवारातील वैशाली

**-> पान 2 वर**

## उरणमध्ये पूरपरिस्थितीत नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर स्वत: रस्त्यावर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण तालुक्यात, शहरात सतत जोरदार पाऊस सुरु असून उरण शहरात आज झालेल्या प्रचंड मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा कठीण प्रसंगी उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांनी स्वतःच्या सुरक्षिततेची पर्वा न करता थेट मैदानात उतरून मदतकार्य सुरू केले



आहे.

सत्र न्यायालय (सेशन कोर्ट) परिसर आणि उरणमधील इतर गंभीर पूरग्रस्त भागांमध्ये भावनाताई घाणेकर यांनी स्वतः पाण्यात उतरून परिस्थितीची पाहणी केली. अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी पोहोचवणे आणि पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला गती देणे, यासाठी त्या स्वतः जागोजागी धावपळ करताना दिसत आहेत.

नगराध्यक्षांच्या या धाडसी भूमिकेमुळे 'प्रशासकीय यंत्रणा संपूर्ण ताकदीने नागरिकांच्या पाठीशी उभी असून, कोणीही घाबरून जाऊ नये,' असे आवाहन यावेळी नगराध्यक्षांनी केले आहे.

## 23 नगरसेवकांच्या चौकशीला आयुक्तांकडून वेग

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेतील २३ माजी नगरसेवकांविरोधातील पात्रतेच्या तक्रारींवर आता प्रशासकीय पातळीवर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. आचारसंहिता आणि विविध तांत्रिक कारणांमुळे गेल्या काही काळापासून रखडलेल्या या प्रकरणांची चौकशी लवकरच पूर्ण केली जाणार असून, त्याचा अंतिम अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी दिली आहे.

निवडणूक लढवताना तिसऱ्या अपत्याची माहिती लपवणे, नामनिर्देशन पत्रासोबत जोडलेल्या शपथपत्रात चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती देणे, महापालिकेच्या किंवा सार्वजनिक जागेवर स्वतः अतिक्रमण करणे, तसेच प्रशासनाकडून सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेला बेकायदेशीरपणे विरोध करणे अशा विविध गंभीर कारणांवरून या संबंधित नगरसेवकांविरोधात महापालिका प्रशासनाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. या प्रकरणांची फाईल पुन्हा खुली झाली असून, प्रशासनाने पुरावे आणि तक्रारींची छाननी सुरू केली आहे. आयुक्तांनी दिलेल्या या आदेशामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या लोकप्रतिनिधींवर कोणती कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## "शाल जोडे"




## जळगावात लाचखोर मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याच्या घरात कोट्यवधीचे सापडले कोट्यावधीचे घबाड

**जळगाव :** शहरातील मूळ रहिवासी आणि सध्या अकोला येथे मुद्रांक जिल्हाधिकारी असलेले किरण चौधरी यांच्याविरोधात लाचखोरीप्रकरणी सुरू असलेल्या तपासाला आता नवे वळण मिळाले आहे. नाशिक आणि जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) संयुक्त पथकाने जळगाव शहरातील त्यांच्या सीलबंद निवासस्थानाची 'इन-कॅमेरा' झाडाझडती घेतली. अत्यंत गोपनीय पद्धतीने पार पडलेल्या या कारवाईत सोने, चांदी, रोख रक्कम, असे कोट्यवधीचे घबाड तसेच काही महत्त्वाचे दस्तऐवज हाती लागल्याची माहिती मिळाली आहे.

किरण चौधरी यांच्यावर काही दिवसांपूर्वी लाचखोरीप्रकरणी अकोला येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती. त्यानंतर जळगाव शहरातील साईप्रभा आर्केड अपार्टमेंटमधील त्यांचे निवासस्थान सील करण्यात आले होते. या कारवाईनंतर प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असतानाच सीलबंद घरात घुसून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. या प्रकरणात चौधरी यांच्या दोन नातेवाईकांनी सील असलेल्या घरात प्रवेश करून



पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. जिल्हापेठ पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांनाही रंगेहाथ ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर चौधरी यांचे घर पुन्हा सील करून तेथे पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**एसीबीकडून गोपनीय पद्धतीने झाडाझडती :** दरम्यान, गुरुवारी दुपारनंतर नाशिक आणि जळगाव येथील एसीबीच्या अधिकाऱ्यांचे विशेष पथक साईप्रभा आर्केड येथे दाखल झाले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अधिकाऱ्यांनी सीलबंद घर उघडून 'इन-कॅमेरा' झाडाझडतीला सुरुवात केली. या संपूर्ण कारवाईदरम्यान बाहेरील व्यक्तींना प्रवेश देण्यात आला नाही.

### जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशील

**एसीबीच्या माहितीनुसार, मुद्रांक जिल्हाधिकारी चौधरी यांच्या जळगावमधील घरातून सुमारे १,५३,८४,६३० रुपये इतकी रोकड जप्त करण्यात आली. याशिवाय ६०,५७,१३५ रुपये किमतीचे ४२२ ग्रॅम सोन्याचे दागिने, ३१,४१६ रुपये किमतीचे चांदीचे दागिने, ६२,१३,३७६ रुपये किमतीचे स्वतः व नातेवाईकांच्या नावावरील मालमत्तेची कागदपत्रे, ११,५२,७४५ रुपये किमतीच्या सोने खरेदीच्या पावत्या तसेच ६,२५,५४५ रुपये किमतीच्या घरगुती वस्तू जप्त करण्यात आल्या. अशा प्रकारे एकूण २,९४,६४,८४७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

# संपादकीय

## तण्मूलमधील गळती आणि ममता बॅनर्जींसमोरील आव्हाने

पश्चिम बंगालच्या राजकारणात तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) ज्येष्ठ नेत्या आणि ममता बॅनर्जी यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी चंद्रिमा भट्टाचार्य यांनी पक्षातील सर्व संघटनात्मक पदांचा दिलेला राजीनामा ही केवळ एक प्रशासकीय घडामोड नाही, तर तो पक्षांतर्गत धुसपुशीचा एक मोठा स्फोट आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आधीच अडचणीत सापडलेल्या तृणमूल काँग्रेससाठी हा निर्णय अत्यंत धक्कादायक आणि राजकीयदृष्ट्या मोठे नुकसान करणारा मानला जात आहे. ममता बॅनर्जी यांच्या सावलीसारख्या वावरणाऱ्या आणि पक्ष संघटनेसह सरकारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नेत्याने अचानक घेतलेली ही माघार टीएमसीमधील अंतर्गत नेतृत्वाविषयी आणि कार्यपद्धतीविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. चंद्रिमा भट्टाचार्य यांनी केवळ संघटनात्मक जबाबदाऱ्यांमधूनच मुक्त होण्याचा निर्णय घेतलेला नाही, तर पक्षाच्या आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे 'स्वाक्षरी अधिकारी' (Authorised Signatory) हे पदही सोडले आहे. याचा अर्थ हा राजीनामा केवळ नाराजीतून आलेला नसून, पक्षाच्या धोरणात्मक निर्णयांवरून निर्माण झालेल्या तीव्र मतभेदांचा परिणाम असावा, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ममता बॅनर्जी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या आणि पक्ष व सरकार यांच्यात समन्वय राखणाऱ्या नेत्याने थेट स्वाक्षरीच्या अधिकारावरच पाणी सोडणे, हे पक्षाच्या अंतर्गत निर्णय प्रक्रियेत काहीतरी गंभीर बिघडल्याचे संकेत देते. विशेष म्हणजे, विधानसभा निवडणुकीतील अपेक्षेप्रमाणे यश न मिळाल्यामुळे तृणमूल काँग्रेसमध्ये अनेक दिवसांपासून अंतर्गत धुसपुस सुरू असल्याचे बोलले जात आहे. केंद्रीय नेतृत्वाचे वर्चस्व आणि जुन्या-जाणत्या नेत्यांना बाजूला सारण्याची चाललेली प्रक्रिया यावरून पक्षात दोन तट पडल्याची चर्चा आहे. अशा नाजूक परिस्थितीत चंद्रिमा भट्टाचार्य यांच्यासारख्या निष्ठावान नेत्याचा राजीनामा पक्षात सर्व काही आलबेल नसल्याचे दाखवून देतो. राजीनाम्याचे कारण अद्याप अधिकृतपणे समोर आले नसले, तरी या निर्णयाने पक्षातील इतर नाराज नेत्यांनाही तोंड उघडण्यास बळ मिळू शकते, ही ममता बॅनर्जी यांच्यासाठी सर्वात मोठी चिंतेची बाब ठरेल. या संपूर्ण प्रकरणावर अद्याप तृणमूल काँग्रेस किंवा ममता बॅनर्जी यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, तसेच हा राजीनामा स्वीकारला जाणार की त्यांची मनधरणी केली जाणार, यावरही स्पष्टता नाही. परंतु, या घटनेमुळे विरोधी पक्षांना टीएमसीवर आणि ममता बॅनर्जी यांच्या एकतंत्री कारभारावर टीकेची झोड उठवण्यासाठी मोठे कोलीत मिळाले आहे. आगामी काळात ममता बॅनर्जी या बंडखोरीला कशा प्रकारे हाताळतात आणि पक्षाची विस्कटलेली घडी पुन्हा कशी बसवतात, यावरच पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे भवितव्य अवलंबून असणार आहे. हा राजीनामा बंगालच्या राजकारणात नव्या समीकरणांची नांदी ठरणार की केवळ एक तात्पुरती वादळ, हे येणारा काळच ठरवेल.

## विवादित शाळा व महाविद्यालयावर नेमणार प्रशासक; आता शासन पवित्र पोर्टल द्वारे शिक्षक भरती संस्थेतील अंतर्गत वादामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी.**

**परभणी :** खाजगीअनुदानित शाळा व शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनातील वाद विवादामुळे शिक्षक भरती रखडून पडल्याने व संस्थेमध्ये नात्यागोत्याचे कर्मचारी भरण्याच्या नादात शिक्षक भरती रखडू नये व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने बुधवार दिनांक 1 जुलै रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय घेतला आहे. धर्मदाय आयुक्त कार्यालयात एखाद्या संस्थेचा वाद एक वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित असल्यास शिक्षक भरतीची प्रक्रिया प्रशासनाच्या देखरेखीखाली पवित्र पोर्टल द्वारे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. शासन निर्णय एक जुलै 2026 नुसार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक शिक्षण अधिकारी यांनी मुख्याध्यापक अथवा प्रभारी मुख्याध्यापकाच्या मदतीने शिक्षक संवर्गातील बिंदू नामावली तपासून भरती प्रक्रिया राबवावी संच मान्यता अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन आणि रिक्त पदाची निश्चिती झाल्यानंतर मंजूर रिक्त पदांच्या 80% मर्यादित भरतीची जाहिरात पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे भरतीसाठी पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी शिक्षक टी ई टी आधारे करून 1-1 शिफारस झालेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत नियुक्ती नाकारता येणार नाही नियुक्ती काढण्याचे आदेश संबंधित मुख्याध्यापक किंवा प्रभारी मुख्याध्यापक यांच्याकडे राहणार आहे तसेच मुख्याध्यापकाने सहकार्य न केल्यास संबंधितांचे वेतन रोखून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

## पिसादेवी येथे उघड्या डीपीचा शॉक लागून मजुराचा मृत्यू

**पान 1 वरून ->**

ढाबा परिसरात आले होते. या परिसरात महावितरणची डीपी बऱ्याच काळापासून उघड्या अवस्थेत होती. शनिवारी दुपारी या उघड्या डीपीमुळे परिसरात अचानक विजेचा प्रवाह उतरला. त्यावेळी सुरेश साळवे यांच्या संपर्कात हा प्रवाह आल्याने त्यांना जोरदार शॉक बसला. शॉक इतका भीषण होता की त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सिडको पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

**कुटुंबावर दुःखाचा डोंगर :** सुरेश साळवे हे रोजंदारीवर मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी आणि तीन लहान मुली असा परिवार आहे. घरातील एकमेव कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तीन चिमुकल्या मुलींच्या डोक्यावरचे पितृछत्र हरपल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

**महावितरणच्या कारभारावर संताप :** महावितरणच्या अनागोंदी कारभाराचा आणि दुर्लक्षित व्यवस्थेचा आणखी एक निष्पाप बळी गेल्याची प्रतिक्रिया नातेवाईकांनी व्यक्त केली. घटनेनंतर महावितरणच्या कारभाराविरुद्ध त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

# "एससी समाजात जर फूट पडली, तर पुन्हा एकत्र आणणारा महामानव जन्माला येणार नाही!"

समाजाचा इतिहास हा केवळ संघर्षाचा इतिहास नसतो; तो त्यागाचा, एकतेचा, आत्मसन्मानाचा आणि परस्पर विश्वासाचा इतिहासही असतो. कोणत्याही समाजाला बाहेरून आलेले संकट जितके धोकादायक नसते, त्यापेक्षा अधिक धोकादायक असते ते समाजाच्या अंतःकरणात निर्माण होणारे मतभेद, अविश्वास आणि विभाजन. कारण बाह्य शत्रूशी लढण्यासाठी समाज एकत्र येऊ शकतो; पण जेव्हा आपल्याच माणसांमध्ये दरी निर्माण होते, तेव्हा त्या जखमा भरून काढण्यासाठी अनेक पिढ्या लागतात. भारतीय समाजव्यवस्थेने शतकानुशतके अनुसूचित जातींतील समाजघटकांना अस्पृश्यता,सामाजिक बहिष्कार, अपमान आणि अमानुष वागणूक दिली. गावकुसाबाहेरचे जीवन, शिक्षणापासून वंचित राहणे, श्रम करूनही सन्मान न मिळणे आणि माणूस म्हणूनही स्वीकार न मिळणे, हा या समाजाचा इतिहास होता. पण या अंधःकारमय इतिहासाला आशेचा किरण मिळाला तो सामाजिक क्रांतीच्या विचारांनी. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संघर्षातून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची मशाल प्रज्वलित केली. त्यांनी वंचित समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत, तर स्वाभिमानाने जगण्याची नवी दृष्टी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांना एकाच घटनात्मक चौकटीत स्थान देऊन त्यांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण केले.परंतु आज अनुसूचित जातींतील 59 जातींपैकी विशेषतः मातंग आणि बौद्ध समाजातील काही व्यक्तींमध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा सार्वजनिक चर्चांमध्ये परस्परांविषयी अपमानास्पद भाषा वापरली जात असल्याचे दिसून येते. मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण मनभेद निर्माण होणे समाजासाठी घातक आहे.आज आरक्षणाचे उपवर्गीकरण हा विषय चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. या विषयावर वेगवेगळी मते असणे लोकशाहीत स्वाभाविक आहे. काही समाजघटक उपवर्गीकरणाला सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक मानतात, तर काहींच्या मते त्यामुळे अनुसूचित जातींच्या ऐक्यावर परिणाम होऊ शकतो. कोणतीही भूमिका असो, ती संविधानाच्या चौकटीत, परस्पर सन्मानाने आणि वस्तुनिष्ठ चर्चेतून मांडली गेली पाहिजे. कारण कोणत्याही मतभेदापेक्षा समाजाची एकजूट अधिक मौल्यवान आहे.आज स्वतःला प्रत्येकाने एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे महापुरुषांनी आपल्याला एकत्र आणण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले, मग आपण त्यांच्या विचारांच्या वारशाचे तुकडे का करावेत? आपल्या पूर्वजांच्या वेदना समान होत्या, संघर्ष समान होता आणि न्यायाची लढाईही समान होती. मग आज आपण एकमेकांविरुद्ध का उभे राहत आहोत? लक्षात ठेवा, समाज मोडायला काही क्षण पुरतात; पण समाज जोडण्यासाठी एका युगपुरुषाचा जन्म घ्यावा लागतो. म्हणूनच आज प्रत्येकाने आपल्या शब्दांत संयम, विचारांत विवेक आणि कृतीत बंधुभाव ठेवण्याची गरज आहे. कारण जर अनुसूचित जातींच्या समाजात फूट पडली, तर ती भरून काढण्यासाठी पुन्हा एखादा महामानव जन्माला येईल, याची कोणतीही खात्री नाही. म्हणून मतभेद असले तरी मनभेद होऊ देऊ नका; कारण एकतेतच समाजाचे भविष्य, सामर्थ्य आणि सामाजिक न्यायाचे स्वप्न सुरक्षित आहे.

"संविधानाने दिलेला अधिकार हा कोणत्याही एका जातीचा नाही; तो शतकानुशतके अन्याय सहन केलेल्या प्रत्येक अनुसूचित जातीच्या माणसाचा आहे."भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करताना केवळ एका समाजाचा विचार केला नव्हता. त्यांनी भारतातील शतकानुशतके अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, अपमान आणि अन्याय सहन केलेल्या सर्व अनुसूचित जातींच्या समान न्यायाचा विचार केला.आज महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये ५९ जातींचा समावेश आहे. हा समावेश कोणत्याही एका समाजाला वरचढ ठरवण्यासाठी नव्हता, तर सर्व वंचित घटकांना संविधानाच्या संरक्षणाखाली आणण्यासाठी होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समाजातील विषमता स्पष्ट दिसत होती. प्रत्येक जातीची वेदना वेगळी असली, तरी अन्यायाचा इतिहास मात्र समान होता. म्हणून त्यांनी संघर्षाचा मार्गही सामूहिक ठेवला. त्यांना माहिती होते की जर वंचित समाज एकत्र राहिला तरच तो स्वतःचे हक्क टिकवू शकेल; पण जर तो जाती-जातींमध्ये विभागला गेला, तर त्याची शक्ती कमी होईल.आज समाजात आरक्षण, उपवर्गीकरण आणि प्रतिनिधित्व यांसारख्या विषयांवर चर्चा होत आहे. या चर्चेत मतभेद असू शकतात. वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात. परंतु एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे कोणताही प्रश्न असा नसावा की ज्यामुळे समाजात परस्पर द्वेष, संशय आणि संघर्ष निर्माण होईल. सामाजिक न्यायाचा प्रत्येक प्रश्न संविधानाच्या चौकटीत, वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या आधारे आणि सर्व घटकांचा सन्मान राखत सोडवला गेला पाहिजे.आज गरज आहे ती एकमेकांवर आरोप करण्याची नाही, तर एकमेकांचे दुःख समजून घेण्याची. एका जातीच्या वेदनेचा अपमान करून दुसऱ्या जातीचा सन्मान वाढत नाही. उलट, त्यामुळे संपूर्ण समाज कमकुवत होतो.

बाबासाहेबांनी दिलेला मूलमंत्र होता "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." या संदेशात "संघटित व्हा" हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण संघटन तुटली तर संघर्षाची ताकदही कमी होते.५९ जातींचे घटनात्मक स्थान हे संविधानाने दिलेले समान सन्मानाचे स्थान आहे. त्या सर्व जाती संविधानाच्या नजरेत समान आहेत. कोणाचाही अधिकार हिरावून घेणे किंवा कोणाला कमी लेखणे हा बाबासाहेबांच्या विचारांचा मार्ग नाही. त्यांचा मार्ग म्हणजे समता, बंधुता आणि न्याय.आज सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकदा समाजात गैरसमज पसरवले जातात. काही लोक जाणीवपूर्वक जाती-जातींमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी प्रत्येक सुजाण नागरिकाने विचारपूर्वक भूमिका घेणे आवश्यक आहे. शब्द हे समाज जोडू शकतात आणि तेच समाज तोडूही शकतात. म्हणून संवादात संयम, विचारात विवेक आणि कृतीत संविधाननिष्ठा असणे आवश्यक आहे.

बाबासाहेबांनी संविधान लिहिताना पुढील पिढ्यांचा विचार केला होता. त्यांनी असा भारत घडवण्याचे स्वप्न पाहिले होते, जिथे प्रत्येकाला समान संधी मिळेल आणि कोणालाही जातीमुळे अपमानित व्हावे लागणार नाही. हे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांची आहे.आज जर आपण ५९ जातींमध्ये भिंती उभारल्या, तर उद्या त्या भिंती आपल्या मुलांच्या भविष्यालाही अडवतील. पण जर आपण एकतेचा पूल बांधला, तर पुढील पिढी अधिक सक्षम, शिक्षित आणि स्वाभिमानी बनेल. म्हणून मतभेद असू द्या, पण मनभेद होऊ देऊ नका. प्रश्न असू द्या, पण परस्परांविषयी द्वेष निर्माण होऊ देऊ नका.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ५९ जातींना एकाच घटनात्मक छत्राखाली आणले, कारण त्यांना विभाजन नव्हे तर समान न्याय हवा होता. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा खरा सन्मान म्हणजे संविधानावर विश्वास ठेवणे, सामाजिक सलोखा जपणे आणि प्रत्येक अनुसूचित जातीच्या बांधवाचा सन्मान करणे.समाजाचे भविष्य संघर्षात नाही, तर समतेच्या मार्गावर चालणाऱ्या एकतेत आहे. बाबासाहेबांचा वारसा जपायचा असेल, तर आपण एकमेकांचे प्रतिस्पर्धी नव्हे, तर सहप्रवासी बनले पाहिजे.

भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संग्रह नाही, तर शतकानुशतके अन्याय सहन केलेल्या समाजाच्या स्वाभिमानाचा दस्तऐवज आहे. या राज्यघटनेने अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे कोणत्याही समाजावर केलेले उपकार नाहीत; तर ऐतिहासिक अन्यायाची घटनात्मक दुरुस्ती आहे. हजारो वर्षे अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार, शिक्षणापासून वंचितता, आर्थिक गुलामी आणि मानवी प्रतिष्ठेचा अभाव सहन करणाऱ्या समाजाला समान संधी मिळावी, यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली.महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या ५९ जातींना समान घटनात्मक संरक्षण मिळाले आहे. या सर्व समाजघटकांचे इतिहास, परंपरा, जीवनपद्धती आणि स्थानिक परिस्थिती वेगवेगळ्या असल्या, तरी त्यांच्यावर झालेल्या सामाजिक अन्यायाचा पाया समान होता. म्हणूनच राज्यघटनेने त्यांना एका घटनात्मक चौकटीत आणून समान न्यायाच्या तत्त्वावर आरक्षणाचा अधिकार दिला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कधीही एका अनुसूचित जातीला दुसऱ्या जातीविरुद्ध उभे केले नाही. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक वंचित समाजघटक हा समान सन्मानाचा अधिकारी होता. आज आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा विषय चर्चेत आहे. या विषयाकडे भावनेपेक्षा अभ्यास, घटनात्मक मूल्ये आणि सामाजिक वास्तव यांच्या आधारे पाहण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीमध्ये वेगवेगळी मते असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या विषयात समर्थन आणि विरोध अशा दोन्ही बाजूंचे मुद्दे समजून घेणे आवश्यक आहे.

उपवर्गीकरणाचे समर्थन करणाऱ्यांचे म्हणणे असे आहे की अनुसूचित जातींमधील काही समाजघटकांना आरक्षणाचा लाभ तुलनेने अधिक प्रमाणात मिळाला, तर काही अत्यंत मागासलेल्या जातींपर्यंत तो अपेक्षित प्रमाणात पोहोचला नाही. त्यामुळे सर्वात वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण, नोकरी आणि प्रतिनिधित्वाच्या संधी पोहोचवण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे ते सांगतात. त्यांच्या मते सामाजिक न्यायाचा अर्थ केवळ समान वाटप नसून सर्वाधिक वंचित घटकांपर्यंत संधी पोहोचणे हा आहे.दुसरीकडे, उपवर्गीकरणाबाबत चिंता व्यक्त करणाऱ्यांचे मतही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, जर उपवर्गीकरण अचूक सामाजिक आकडेवारी, पारदर्शक निकष आणि सखोल अभ्यासाशिवाय झाले, तर त्याचा परिणाम काही समाजघटकांच्या प्रतिनिधित्वावर होऊ शकतो. विशेषतः संख्येने कमी असलेल्या जातींमध्ये अशी भीती व्यक्त केली जाते की उपलब्ध संधी अधिक मर्यादित होतील. त्याचबरोबर अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होऊन समाजात "आपण" आणि "ते" अशी मानसिक विभागणी निर्माण होण्याचाही धोका असल्याचे अनेकांचे मत आहे.या दोन्ही बाजूंमध्ये काही ना काही तथ्य आहे. म्हणूनच हा विषय केवळ भावना, राजकारण किंवा सोशल मीडियावरील प्रचाराच्या आधारे न पाहता घटनात्मक तत्त्वांच्या आधारे समजून घेणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाचा खरा अर्थ म्हणजे कोणत्याही घटकावर अन्याय न होता सर्वात मागे राहिलेल्या व्यक्तीपर्यंत संधी पोहोचणे. त्याच वेळी समाजातील बंधुभाव आणि एकजूटही अबाधित राहिली पाहिजे.आज सर्वात मोठी गरज आहे ती समाजात विश्वास टिकवून ठेवण्याची. आरक्षणाचे उपवर्गीकरण हा विषय न्यायालयीन, घटनात्मक आणि धोरणात्मक प्रक्रियेशी संबंधित आहे. त्यामुळे अंतिम निर्णय कोणताही असो, तो संविधानाच्या चौकटीत, वस्तुनिष्ठ आकडेवारीच्या आधारे आणि सर्व संबंधित समाजघटकांचा विश्वास संपादन करूनच व्हावा. कोणत्याही समाजाला दुसऱ्या समाजाचा विरोधक ठरवणे किंवा परस्परांमध्ये द्वेष निर्माण करणे ही सामाजिक न्यायाची दिशा नाही.एक गोष्ट आपण कधीही विसरू नये अनुसूचित जातींमधील सर्व समाजघटकांचा इतिहास हा अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा इतिहास आहे. त्यांच्या वेदना वेगवेगळ्या असू शकतात; पण त्या वेदनांचे मूळ एकच आहे. त्यामुळे आजही त्यांची खरी लढाई एकमेकांविरुद्ध नसून अशिक्षण, गरिबी, बेरोजगारी, सामाजिक भेदभाव आणि असमानतेविरुद्ध आहे.आज काही स्वार्थी प्रवृत्ती आरक्षणाच्या प्रश्नाचा वापर समाजात अविश्वास निर्माण करण्यासाठी करतात. सोशल मीडियावर अपूर्ण माहिती, भडक संदेश आणि जातीवाचक टीका यामुळे वातावरण अधिक दूषित होते. अशा वेळी प्रत्येक सुजाण नागरिकाने संयम, विवेक आणि घटनात्मक मूल्यांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.अनुसूचित जातीतील विखुरलेला समाज आपल्या हक्कांचे संरक्षण करू शकत नाही, तर एकजूट असलेला समाज घटनात्मक मार्गाने न्याय मिळवू शकतो. म्हणून आरक्षणाबाबत मतभेद असू शकतात, पण मनभेद होता कामा नयेत. सामाजिक न्याय आणि सामाजिक ऐक्य या दोन्ही मूल्यांचा समतोल राखणे हीच आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.आज प्रत्येक अनुसूचित जातीतील बांधवाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे आपण महापुरुषांनी दिलेल्या "संघटित व्हा" या संदेशाला बळ देत आहोत की नकळत समाजात दरी निर्माण करत आहोत? जर उत्तर दुसरे असेल, तर आपण आपल्या विचारांचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. कारण संविधानाने दिलेले हक्क टिकवायचे असतील, तर सर्वप्रथम संविधानाने शिकवलेली समता, बंधुता आणि परस्पर सन्मानाची भावना जिवंत ठेवावी लागेल.

बांधवांनो समाजाला बाहेरून जितका धोका नसतो, त्यापेक्षा कितीतरी मोठा धोका समाजाच्या अंतर्गत फुटीचा असतो. इतिहास साक्षी आहे की ज्या समाजाने एकता गमावली, तो समाज आपले हक्क, आपला स्वाभिमान आणि आपले अस्तित्व टिकवण्यात अयशस्वी ठरला. उलट, ज्या समाजाने मतभेद असूनही एकजूट कायम ठेवली, त्या समाजाने संकटांवर मात करत प्रगतीचा नवा इतिहास घडवला.

आज अनुसूचित जातींतील विविध समाजघटक, विशेषतः मातंग आणि बौद्ध समाज, अनेक सामाजिक प्रश्नांवर वेगवेगळी मते मांडताना दिसतात. लोकशाहीत मतभेद असणे स्वाभाविक आहे; परंतु हे मतभेद मनभेदात बदलले, तर त्याचे सर्वाधिक नुकसान संपूर्ण वंचित समाजालाच सहन करावे लागेल.

अनुसूचित जातीमधील मातंग समाज असो किंवा बौद्ध समाज दोघांचाही इतिहास संघर्षाचा आहे. दोन्ही समाजांनी शतकानुशतके सामाजिक बहिष्कार, अपमान, आर्थिक शोषण आणि शिक्षणापासून वंचित राहण्याचे दुःख अनुभवले आहे. त्यांच्या वेदना वेगळ्या नव्हत्या; फक्त त्या वेदनांना दिलेली जातिनिहाय नावे वेगळी होती. त्यामुळे आज एकमेकांवर टीका करण्यापेक्षा एकमेकांच्या संघर्षाचा सन्मान करणे हीच महापुरुषांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.विशेषतः तरुण पिढीने या बाबतीत अधिक सजग राहिले पाहिजे. कारण उद्याचा समाज त्यांच्या विचारांवर उभा राहणार आहे. आज जर तरुणांच्या हातात संविधानाऐवजी द्वेषाची भाषा आली, तर समाजाचा भविष्यकाळ धोक्यात येईल. पण जर त्याच तरुणांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांची मशाल असेल, तर हा समाज अधिक संघटित, सुशिक्षित आणि प्रगत होईल.आज गरज आहे ती सोशल मीडियावर ट्रोल बनण्याची नाही, तर समाज जोडणारा विचारवंत बनण्याची. जातीवाचक अपमान करणारा प्रत्येक शब्द महापुरुषांच्या विचारांचा अपमान करतो, तर समतेचा आणि सन्मानाचा प्रत्येक शब्द समाजाच्या भविष्यात आशेचा नवा किरण निर्माण करतो. समाजात ऐक्य टिकवण्याची जबाबदारी केवळ तरुणांवरच नाही. प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलांना लहानपणापासूनच माणुसकी, समता आणि बंधुभावाचे संस्कार द्यावेत. "कोणत्याही समाजाचा द्वेष करू नको; प्रत्येक माणसाचा सन्मान कर," हा संस्कार घरातूनच सुरू झाला पाहिजे.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तके शिकवू नयेत, तर भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्येही समजावून सांगावीत. कारण शिक्षण केवळ पदवी देत नाही; ते माणूस घडवते.सामाजिक कार्यकर्त्यांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. समाजात आग लावणारे नव्हे, तर तुटलेली मने जोडणारे कार्यकर्ते आज काळाची गरज आहेत. समाजात वैर निर्माण करणे सोपे असते; पण विश्वास निर्माण करण्यासाठी आयुष्य खर्च करावे लागते.राजकीय आणि सामाजिक नेतृत्वानेही समाजाला भिडवण्याऐवजी जोडण्याची भूमिका घेतली पाहिजे. अल्पकालीन राजकीय फायद्यासाठी समाजात द्वेषाचे बी पेरले, तर त्याचे परिणाम अनेक पिढ्यांना भोगावे लागू शकतात. निवडणुका संपतात, पदे बदलतात; पण समाजात पडलेली दरी अनेक वर्षे कायम राहते.आज प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे "मी समाज जोडतो आहे की समाज तोडतो आहे?" माझे शब्द, माझी पोस्ट, माझे भाषण आणि माझे वर्तन समाजात विश्वास निर्माण करते की वैमनस्य? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तरच आपल्या भविष्यास दिशा देईल.लक्षात ठेवा, समाजाची खरी ताकद त्याच्या संघटनेत असते. इतिहास घडवणारे समाज तेच असतात जे मतभेद असूनही एकत्र राहतात. महापुरुषांनी आपल्याला दिलेला वारसा हा द्वेषाचा नव्हे, तर बंधुभावाचा आहे. म्हणून मतभेद असतील तर ते संवादाने सोडवू या; संघर्ष करायचा असेल तर तो अन्याय, अशिक्षण, गरिबी, बेरोजगारी आणि विषमतेविरुद्ध करू या.मातंग आणि बौद्ध समाज हे दोन विरोधी प्रवाह नाहीत; ते सामाजिक परिवर्तनाच्या एका महान प्रवाहाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. एकाचा सन्मान म्हणजे दुसऱ्याचा अपमान नाही. दोघांची प्रगती, दोघांचा सन्मान आणि दोघांची एकजूट यामध्येच संपूर्ण अनुसूचित जाती समाजाचे आणि व्यापक सामाजिक न्यायाच्या चळवळीचे भविष्य सुरक्षित आहे.म्हणून आज प्रत्येक तरुण, प्रत्येक पालक, प्रत्येक शिक्षक, प्रत्येक सामाजिक कार्यकर्ता आणि प्रत्येक नेता यांनी एकच संकल्प करावा समाजात मतभेद असू शकतात, पण मनभेद होऊ देणार नाही. संविधानावर विश्वास ठेवू, महापुरुषांचे विचार आचरणात आणू आणि समाज जोडण्याचे कार्य करू. कारण तुटलेला समाज कमकुवत होतो; पण एकजूट असलेला समाज इतिहास घडवतो.

आज आपण इतिहासाच्या एका अत्यंत संवेदनशील वळणावर उभे आहोत. एका बाजूला भारतीय संविधानाने दिलेले हक्क, सामाजिक न्यायाची आशा आणि समतेचे स्वप्न आहे; तर दुसऱ्या बाजूला समाजात वाढत चाललेला अविश्वास, कटुता आणि अंतर्गत विभाजनाचे संकट आहे. अशा वेळी प्रत्येकाने एक प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे आपण महापुरुषांनी जोडलेला समाज अधिक मजबूत करीत आहोत की नकळत तो कमकुवत करीत आहोत? महापुरुषांनी आपल्याला कधीही एकमेकांविरुद्ध उभे केले नाही. त्यांनी संघर्ष शिकवला; पण तो स्वतःच्या बांधवांविरुद्ध नव्हे, तर अन्याय, विषमता, अस्पृश्यता, अज्ञान आणि शोषणाविरुद्ध होता. त्यांनी संघटन शिकवले; पण ते सत्ता मिळवण्यासाठी नव्हे, तर समाजाला सन्मानाने उभे करण्यासाठी होते. त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला; कारण त्यांना माहिती होते की सुशिक्षित समाजाला फोडणे कठीण असते.आज जर अनुसूचित जातींतील समाजघटक

एकमेकांविषयी संशय, राग आणि द्वेष बाळगू लागले, तर त्याचा सर्वाधिक फायदा त्या शक्तींना होईल ज्यांना सामाजिक ऐक्य कधीच मान्य नव्हते. इतिहास सांगतो की जेव्हा जेव्हा वंचित समाजात फूट पडली, तेव्हा त्यांचे हक्क कमकुवत झाले. आणि जेव्हा जेव्हा त्यांनी एकजूट राखली, तेव्हा त्यांनी अशक्य वाटणाऱ्या लढायाही जिंकल्या.

आरक्षणाचे उपवर्गीकरण असो किंवा इतर कोणताही सामाजिक प्रश्न त्यावर मतभेद असू शकतात. परंतु मतभेदांचे रूपांतर मनभेदात होऊ देणे ही आपल्या महापुरुषांच्या विचारांची पराजयाची सुरुवात ठरेल. कोणताही प्रश्न संविधानाच्या चौकटीत, अभ्यासपूर्ण चर्चेत आणि परस्पर सन्मानाच्या वातावरणात सोडवला जाऊ शकतो; पण द्वेष, अपमान आणि वैर यातून कधीच न्याय जन्माला येत नाही.आज सर्वात मोठी गरज आहे ती समाजात विश्वास पुन्हा निर्माण करण्याची. एकमेकांच्या वेदना समजून घेण्याची. एकमेकांच्या संघर्षाचा आदर करण्याची. कारण अनुसूचित जातींतील प्रत्येक समाजघटकाचा इतिहास वेगळा असला, तरी अन्यायाचा अनुभव समान आहे. म्हणूनच आपली खरी ओळख ही जातीत नसून सामाजिक न्यायासाठीच्या सामूहिक संघर्षात आहे.आज प्रत्येक मातंग बांधवाने, प्रत्येक बौद्ध बांधवाने आणि अनुसूचित जातींतील प्रत्येक समाजघटकाने मनापासून एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आपण प्रतिस्पर्धी नाही; आपण सहप्रवासी आहोत. आपली लढाई एकमेकांविरुद्ध नाही; ती अजूनही गरिबी, अशिक्षण, बेरोजगारी, भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध आहे. आपले भविष्यही एकमेकांशी जोडलेले आहे. एका समाजाचा अपमान करून दुसऱ्या समाजाचा सन्मान वाढत नाही; उलट संपूर्ण समाजाची ताकद कमी होते.आज प्रत्येक आईने आपल्या मुलाला समतेचा संस्कार द्यावा. प्रत्येक वडिलांनी स्वाभिमानाबरोबर संयम शिकवावा. प्रत्येक शिक्षकाने संविधानातील बंधुतेची भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवावी. प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्याने समाजात दरी निर्माण करण्याऐवजी पूल बांधण्याचे काम करावे. प्रत्येक नेत्याने समाजाच्या भावनांचा राजकीय वापर न करता समाजाच्या विश्वासाचे रक्षण करावे. आणि प्रत्येक तरुणाने सोशल मीडियावर द्वेष पसरवण्याऐवजी विचार, विवेक आणि संवादाची संस्कृती रुजवावी.

लक्षात ठेवा, समाज तोडणे खूप सोपे असते. एका भडक भाषणाने, एका आक्षेपार्ह पोस्टने किंवा एका द्वेषपूर्ण वक्तव्याने अनेक वर्षांचे विश्वासाचे नाते तुटू शकते. पण ती तुटलेली मने जोडण्यासाठी एका युगपुरुषाचे संपूर्ण आयुष्य खर्ची पडते. म्हणूनच शब्द वापरताना, लिहिताना, बोलताना आणि वागताना आपण स्वतःला विचारले पाहिजे माझे शब्द समाज जोडत आहेत की समाज तोडत आहेत? आज आपण ज्या पिढीत जगत आहोत, त्या पिढीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा दुसरा महामानव उभा नाही. उद्या पुन्हा असा युगपुरुष जन्माला येईल, याची कोणतीही खात्री नाही. म्हणूनच आज प्रत्येकाने आपल्या आचरणात बाबासाहेबांच्या विचारांचा अंश जागवला पाहिजे. प्रत्येकाने स्वतःमध्ये समता, बंधुता, न्याय आणि माणुसकीची ज्योत प्रज्वलित केली पाहिजे. आपणच समाज जोडणारे दूत झालो, तरच महापुरुषांच्या संघर्षाला खरी दिशा मिळेल.

बांधवांनो "समाज जोडूया, कारण फूट पाडणारे अनेक भेटतील; पण तुटलेला समाज पुन्हा जोडण्यासाठी महामानव जन्माला येईल, याची कोणतीही खात्री नाही.""संघर्ष आपसात नको... संघर्ष अन्यायाविरुद्ध हवा.वाद नको... संवाद हवा.द्वेष नको... बंधुभाव हवा.

फूट नको... संविधानाच्या मूल्यांवर आधारित एकजूट हवी.हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक क्रांतीला खरी मानवंदना आणि हीच आपल्या पुढील पिढ्यांसाठीची सर्वात मोठी जबाबदारी आहे."आज जर आपण एकत्र राहिलो, तर आपल्या पुढच्या पिढ्या शिक्षणात, उद्योगात, प्रशासनात आणि समाजकार्यात मोठी झेप घेतील. पण आपणच एकमेकांविरुद्ध उभे राहिलो, तर त्याची किंमत आपल्या मुलांना चुकवावी लागेल. तोडणे खूप सोपे आहे पण जोडणे खूप अवघड आहे. तुटलेली मने जोडण्यासाठी एका युगपुरुषाची गरज भासते.आज आपल्या काळात असा महामानव नाही जो पुन्हा सर्वांना एकत्र आणेल. म्हणूनच आज प्रत्येकाने स्वतःमध्येच त्या महामानवाच्या विचारांचा अंश जागा करणे आवश्यक आहे. आपणच एकतेचे दूत झालो, तर समाज सुरक्षित राहील; अन्यथा इतिहास आपल्याला कधीच माफ करणार नाही. एक गोष्ट लक्षात ठेवा एकतेत शक्ती आहे, विभाजनात विनाश आहे.म्हणूनच प्रत्येक मातंग बांधवाने आणि प्रत्येक बौद्ध बांधवाने बोलताना, लिहिताना आणि वागताना एकच गोष्ट लक्षात ठेवावी

"आपण एकमेकांचे शत्रू नाही; आपण एकाच संघर्षाच्या इतिहासाचे वारसदार आहोत. आपली लढाई एकमेकांविरुद्ध नसून अन्याय, विषमता आणि द्वेषाविरुद्ध आहे. समाज जोडूया, कारण पुन्हा एकदा समाजाला जोडण्यासाठी महामानव जन्माला येईल, याची कोणतीही खात्री नाही."

लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.


**- समाजभूषण रामदास वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**



छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्याचे नवनिर्वाचित भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार सुहास भाऊ शिरसाट यांचा छत्रपती संभाजी नगर पंचायत समितीचे माजी सदस्य तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते अशोक आबा साळुंखे गुलटगावकर यांनी भेट घेऊन या सर्कल मधील विकास कामाबाबत चर्चा करून शाल श्रीफळ देऊन सत्कार केला याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

( छाया संतोष करपे )

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात दोन लाचखोर कर्मचारी पोलिसांच्या जाळ्यात





हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकी नावावर करण्यासाठी व तसेच दुचाकीचा नंबर संगणकावर पडताळून दंड प्रलंबित नसल्याचा खात्रीचा शिका मारण्यासाठी लाच मागणाऱ्या दोन लिपिकावर कारवाई करण्यात आली आहे. परभणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवार तीन जुलै रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आसोला येथे कारवाई केली या संबंधितावर ताडकळस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अधिक माहिती अशी की मीरा नारायणराव लोकरे कनिष्ठ लिपिक, व सय्यद जबर सय्यद अकबर लिपिक असे लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत दिनांक एक जुलै रोजी एका 28 वर्षे तरुणाने ही तक्रार दिली होती त्यांची दुचाकी स्वतःच्या नावावर करण्यासाठी आवश्यक ते शुल्क भरण्यानंतर कनिष्ठ लिपिक मीरा लोकरे यांनी एक हजाराची लाच मागितली तडजोडी आणती आठशे रुपये देण्याचे ठरवले तसेच दुसरे लिपिक सय्यद जफर यांनी संबंधित तक्रारदाराने खरेदी केलेल्या मोटरसायकलचा नंबर संगणकावर पडताळून आरटीओ कार्यालय मार्फत दंड प्रलंबित नसल्याची खात्री करून व त्या कागदपत्रावर नो वांटेड शिक्का मारून दुचाकी चा नंबर लिहिण्याच्या कामासाठी पाचशे रुपयांची लाच मागितली यानंतर शुक्रवार दिनांक 3 जुलै रोजी परभणी लाच लुचपत विभागाच्या पथकाने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय असोला येथे सापळा रचून लिपिक मीरा लोकरे व सय्यद जबर यांना पंचा समक्ष तक्रारदाराकडून रक्कम स्वीकारली ही कारवाई पोलीस उपअधीक्षक महेश पाटणकर पोलीस निरीक्षक अल्ताफ मुलानी अनेक कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली लाचखोरा जवलिळ मोबाईल फोन जप्त करण्यात आला असून त्यांच्या घराची झाडाझुडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास ताडकळस. पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहे.

## हर्सूल कारागृह परिसरात स्वच्छता अभियान; 130 रोपांची लागवड



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने हर्सूल मुख्य कारागृहासमोरील मैदान परिसरात शनिवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छतेनंतर परिसरात 130 वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमात नगरसेवक राज गौरव वानखेडे, राहुल रोजतकर, उल्हास पाटील तसेच माजी नगरसेविका स्वाती नागरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी महानगरपालिकेचे उपआयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभागप्रमुख नंदकिशोर भोंबे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील, उद्यान निरीक्षक नानासाहेब पठाडे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अभियानादरम्यान कारागृहासमोरील परिसराची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर विविध प्रजातींच्या 130 रोपांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपणामुळे परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

स्वच्छता आणि वृक्षसंवर्धन या दोन्ही बाबींना चालना देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. महानगरपालिकेने आगामी काळातही शहरातील विविध भागांत अशा प्रकारची स्वच्छता व वृक्षारोपण मोहिम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

## सय्यद नदीम सलीम यांचे निधन



**सिल्लोड :** प्रतिनिधी .. सिल्लोड शहरातील मोहम्मदया यशवंत नगर शासकीय झोपडपट्टी परिसरातील रहिवाशी असलेले सय्यद नदीम सय्यद सलीम वय ४३ वर्ष यांचे दीर्घ आजाराने दि.०४ शनिवार रोजी सकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान एमजीएम हॉस्पिटल औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर येथे उपचार दरम्यान प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई-वडील पत्नी दोन मुले एक मुलगी भाऊ-बहीण असा मोठा परिवार आहे. सय्यद नदीम यांची नमाजे जनाजा जामा मस्जिद मध्ये अदा करण्यात आली असून त्यांचा दफनविधी जुनी भाजी मंडी परिसरातील कब्रस्तांमध्ये करण्यात आला. सय्यद नदीम सय्यद सलीम हे माजी नगरसेवक सय्यद फक्रुद्दीन व माजी नगरसेवक पत्रकार निवृत्त प्रा.मन्सूर कादरी यांचे भाचे तर कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉम्रेड सय्यद अनिस व पत्रकार सोहेल कादरी यांचे आत्या भाऊ होत.

# उद्योगवाढीसोबत सुरक्षेची नवी रणनीती; शेंद्रा औद्योगिक क्षेत्रासाठी ग्रामीण पोलिसांचा समन्वयाचा फॉर्म्युला

### उद्योग सुरक्षा, वाहतूक व महिला सुरक्षेसाठी संयुक्त कृती आराखडा




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शेंद्रा, बिडकीन, करमाड आणि परिसरातील वेगाने विस्तारत असलेल्या औद्योगिक पट्ट्यात गुन्हेगारीला आळा घालण्याबरोबरच उद्योगांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी पुढाकार घेत उद्योग–पोलीस समन्वय बैठकीचे आयोजन केले. औरिक (डीएमआयसी) येथील सभागृहात झालेल्या या बैठकीत उद्योग सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन, महिला सुरक्षा, सायबर गुन्हे प्रतिबंध, कामगार पडताळणी आणि स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या प्रस्तावासह अनेक महत्त्वाच्या विषयांवर ठोस निर्णय घेण्यात आले.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीस शंभरहून अधिक उद्योगांचे प्रतिनिधी, राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अधिकारी, एमआयडीसी, औरिक (डीएमआयसी) तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा नांगरे तसेच चिकलठाणा, करमाड, बिडकीन आणि एम. पैठण पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारीही सहभागी झाले.

यावेळी प्रकाश जाधव यांनी उद्योगांच्या सुरक्षेसाठी 'घटना घडल्यानंतरची कारवाई' नव्हे, तर 'घटना घडू न देण्याची प्रतिबंधात्मक पोलिसिंग' ही भूमिका स्वीकारण्यात आल्याचे स्पष्ट केले. उद्योगांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांच्या अडचणी तातडीने सोडविणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना आधीच राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या वाहतूक समस्येवर विशेष चर्चा झाली. प्रमुख चौकांमध्ये लेफ्ट टर्न, ट्रॅफिक सिग्नल, लेन शिस्त, स्पीड ब्रेकरसाठी तज्ज्ञ समिती, ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती आणि शिफ्ट बदलाच्या वेळेतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याचे ठरविण्यात आले. केंब्रिज चौक, चित्तेगाव चौक, शेंद्रा प्रवेशद्वार, रॅडिको कंपनी परिसर आणि गेवराई तांडा येथील अपघातप्रवण ठिकाणांसाठी विशेष कृती आराखडाही तयार केला जाणार आहे.

प्रत्येक उद्योगात अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा, डेटा बॅकअप, संबंधित पोलीस ठाण्याला लाईव्ह ॲक्सेस, RFID आधारित प्रवेश नियंत्रण प्रणाली आणि सक्षम सुरक्षा व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात आला. सर्व कामगारांची चारित्र्य पडताळणी, महिला कर्मचाऱ्यांसाठी रात्री विशेष गस्त, सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याबाबतही निर्णय घेण्यात आले.

अतिक्रमण, अमली पदार्थविरोधी मोहीम, बंद उद्योगांची सुरक्षा, खंडणीच्या तक्रारी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी संयुक्त कृती आराखडा राबविण्यात येणार असून, दरमहा उद्योग–पोलीस समन्वय बैठक घेण्याचा निर्णय बैठकीत झाला. तसेच शेंद्रा औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या प्रस्तावाला गती देण्याचेही पोलीस अधीक्षकांनी जाहीर केले. उद्योग प्रतिनिधींनी या उपक्रमाचे स्वागत करत ग्रामीण पोलिसांना पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली.

## एसआयआर मोहिमेसाठी प्रशासन सक्रिय; अंधारीत फिरता दौरा

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी



**अंधारी दि. ४ जुलै :** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी व तहसीलदार अंकिता ताकभाते यांनी अंधारी येथे फिरता दौरा करून बीएलओंच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी मतदार यादी अद्ययावतीकरण, नवीन मतदार नोंदणी, दुरुस्ती व अपात्र मतदारांची नावे वगळण्याच्या कामाचा आढावा घेत अचूक व वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच घरभेटीद्वारे पात्र मतदारांची पडताळणी करण्यावर भर देण्यात आला. प्रशासनाने प्रत्येक पात्र नागरिकाने आवश्यक कागदपत्रांसह वेळेत मतदार नोंदणी व दुरुस्ती प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले.

## चारठाणा अपर तहसील कार्यालय मंजूर; शेतकऱ्यांची रॉयल्टी रद्द, मंत्रीद्वयींचे आभार



**चारठाणा अपर तहसील कार्यालयास मंजुरी व शेतकऱ्यांची गौण खनिजावरील रॉयल्टी रद्द केल्याबद्दल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन नानासाहेब राऊत, भाजप उपाध्यक्ष अविनाश काळे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र नागरे व गंगाधर तरटे यांनी आभार व्यक्त केले.**

**जिंतूर|प्रतिनिधी:** चारठाणा येथे अपर तहसील कार्यालयास मंजुरी तसेच शेतकऱ्यांसाठी गौण खनिजावरील रॉयल्टी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल नानासाहेब राऊत, भाजप उपाध्यक्ष अविनाश काळे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र नागरे व गंगाधर तरटे यांनी मुंबई येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

चारठाणा परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासून अपर तहसील कार्यालयाची मागणी प्रलंबित होती. या मंजुरीमुळे महसूलविषयक कामांसाठी जिंतूरला जाण्याची गरज कमी होऊन नागरिकांना स्थानिक पातळीवर सेवा उपलब्ध होणार आहे. तसेच शेतीसाठी आवश्यक माती, मुरूम व इतर गौण खनिजांवरील रॉयल्टी रद्द करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

भेटीदरम्यान नानासाहेब राऊत यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. चारठाणा परिसरातील प्रलंबित विकासकामांना भविष्यातही गती देण्याची विनंती त्यांनी यावेळी केली.

## सिल्लोड तालुका वकील संघात राज्यमंत्री दर्जा प्राप्त इद्रीस मुलतानी यांचा सत्कार



**अजींठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्याचे भूमिपुत्र मा. श्री. इद्रीसजी मुलतानी यांचे समाज कार्याची दखल घेऊन कर्तव्यदक्ष मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी

राज्यातील मुस्लिम समाजाच्या विविध घटकांना व उपजातींच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने आहे अमागास व विकास कामी करावयाच्या उपाययोजनांची अनुषंगाने अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी मुस्लिम समाजाच्या राज्य स्तरीय अभ्यास समीती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष राज्य मंत्री दर्जा म्हणून नेमणूक केली आहे. सिल्लोड तालुक्याला हा पहिल्यांदाच राज्यमंत्री दर्जा प्राप्त मान मिळाल्यामुळे मा. श्री. इद्रीसजी मुलतानी यांचा जाहीर सत्कार तालुका वकील संघाच्या कार्यालयात नुकताच करण्यात आला.

यावेळी तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अशोक दादा तायडे, सचिव ॲड. हमीद खान, उपाध्यक्ष ॲड. संतोष झाल्टे यांच्यासह

ॲड.डि.बी.जैवळ, ॲड. अभय देशपांडे, ॲड. अनिस अहमद, ॲड. जे.पी.मगर, ॲड. शेख उस्मान, ॲड. इरफान पठाण, ॲड.ए.एस. लोखंडे, ॲड.विलास आर.महाजन, ॲड. के.एस.मोटे , ॲड. बी.के. दांडगे, ॲड. जि.व्हि.ढोणे, ॲड. विजय मंडलेचा, ॲड. शांताराम काकडे, ॲड. एस.एस.दौड, ॲड. एस.के.ढाकरे, ॲड. एस.जी. बोराडे, ॲड. मंगेश पंडीत, ॲड. सुनिल गुळवे, ॲड. इम्रान खान, ॲड. सय्यद रिजवान, ॲड. नजीर तडवी, ॲड. अंकुश गव्हाणे, ॲड.ए.एस.निकाळजे, ॲड.विशाल शेजुळ, ॲड.विशाल सुरडकर, ॲड. के.पी.झलवार, ॲड. कैलास इंगळे आदीं सह महिला प्रतिनिधी ॲड. निलोफर शेख, ॲड. वैजयंती पंडित आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन ॲड. शेख उस्मान तर ॲड. राजेद्र गोरडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेत सहभागी व्हा :- काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते



**हिंगोली :** भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या 'SIR' अर्थात Special Intensive Revision मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला 30 जून ते 29 जुलै पर्यंत राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते व भास्कर पोले यांनी हिंगोली जिल्ह्यातील सर्व मतदारांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

निवडणूक आयोगामार्फत मतदार यादीतील नावांची पडताळणी करण्यासाठी ही विशेष मोहीम राबवली जात आहे. याअंतर्गत बूथ लेव्हल ऑफिसर घरोघरी जाऊन मतदारांकडून माहिती घेणार आहेत. 30 जून ते 29 जुलै पर्यंत निवडणूक आयोगाचा विहित नमुना फॉर्म घेऊन मतदारांच्या घरी येतील. फॉर्मवर माहिती भरताना पासपोर्ट साईज फोटो लागणार असल्याने प्रत्येक मतदाराने २ पासपोर्ट साईज फोटो आधीच काढून ठेवावेत. बाहेरगावी असलेल्या मतदारांनी फोटो नातेवाईकांकडे देऊन ठेवावेत. भरलेल्या फॉर्मवर मतदाराला स्वतः सही किंवा अंगठा करावा लागेल. फॉर्मच्या दोन प्रती असतील. एक फॉर्म स्वतःकडे ठेवायचा आणि दुसरा कडे जमा करायचा आहे. 40 वर्षांवरील मतदारांना 2002 च्या मतदार यादीतील स्वतःचा अनुक्रमांक व भाग क्रमांक द्यावा लागेल. ही यादीकडे उपलब्ध असेल. 40 वर्षांखालील मतदारांना आई, वडील, आजी किंवा आजोबा यापैकी कोणाचाही 2002 च्या यादीतील क्रमांक द्यावा लागेल. विवाहित महिलांनी माहेरच्या नातेवाईकांची 2002 च्या यादीतील माहिती तपासून घ्यावी असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते यांनी सांगितले.

जे मतदार फॉर्म भरून देणार नाहीत, त्यांची नावे मतदार यादीत येणार नाहीत. त्यामुळे मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागेल. ही मोहीम 30 जूनपासून सुरू झाली असूनयासाठी अत्यंत कमी वेळ आहे.

SIR मार्फत माहिती संकलित केल्यानंतर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. आपला मतदार आपला अधिकार आपली जबाबदारी हे लक्षात घेऊन हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने सहकार्य करावे, असे आवाहन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सतीश पाचपुते, भास्कर पोले नाईक यांनी केले आहे.

## बालकांच्या संरक्षणासाठी पोक्सो कायद्याविषयी परभणीत 5 जुलै रोजी जनजागृती कार्यक्रम

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ (पोक्सो कायदा) या विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन दि. ५ जुलै २०२६ (रविवार) रोजी सकाळी १० वाजता श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा परभणी जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संजय ए. देशमुख हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी तसेच विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांमध्ये पोक्सो कायद्याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात पोक्सो कायद्याच्या तरतुदी, बालकांचे हक्क, लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच कायदेशीर संरक्षण याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, नागरिक व पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव बी.एम.काळे यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांची 'उद्योग-पोलीस समन्वय' बैठक संपन्न; 'सुरक्षित उद्योग' संकल्पनेवर भर




हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील शेंद्रा, बिडकीन, करमाड आणि परिसरात वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी एका विशेष समन्वय बैठकीचे आयोजन केले होते. शेंद्रा डीएमआयसी येथील ऑरिक हॉलमध्ये पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीत १०० पेक्षा अधिक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्लांट हेड आणि औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. पोलीस अधीक्षक मा. प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत उद्योग क्षेत्र अधिक सुरक्षित आणि गुंतवणुकीस पोषक बनवण्यासाठी विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी स्पष्ट केले की, औद्योगिक विकास आणि कायदा-सुव्यवस्था या एकमेकांशी अत्यंत निगडित गोष्टी आहेत. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस आता उद्योगांसाठी केवळ घटना घडल्यावर कारवाई करणारे 'रिएक्टिव्ह पोलिसिंग' न करता, गुन्हांना आधीच आळा घालणारे 'प्रिव्हेन्टिव्ह पोलिसिंग' करण्यावर भर देणार आहेत. उद्योग आणि कामगार सुरक्षित राहिले, तरच या परिसराचा आणि पर्यायाने राज्याचा आर्थिक विकास वेगाने होऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. औद्योगिक परिसरातील वाढत्या वाहनसंख्येचा विचार करता वाहतूक व्यवस्थापनासाठी या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शेंद्रा, करमाड आणि बिडकीन भागातील महत्त्वाच्या चौकांमध्ये लेफ्ट टर्न सुविधा सुरू करणे, लेन शिस्तीची अंमलबजावणी करणे, नवीन ट्रॅफिक सिग्नल बसवणे आणि शिफ्ट बदलण्याच्या वेळेत होणारी कोंडी टाळण्यासाठी विशेष नियोजन करण्याचे ठरले. कंपन्यांनी त्यांच्या शिफ्टच्या वेळांची माहिती पोलिसांना देणे आवश्यक असून, केंब्रिज चौक, चित्तेगाव चौक, शेंद्रा प्रवेशद्वार आणि रॅडिको कंपनी परिसरातील अवैध ट्रक पार्किंगवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच गेवराई तांडा येथील अपघातप्रवण क्षेत्रासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार केला जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक उद्योगाने आपल्या परिसरात १०० टक्के उच्च प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, त्यांचा डेटा बॅकअप ठेवणे आणि संबंधित पोलीस ठाण्याला त्याचा थेट प्रवेश उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासोबतच आरएफआयडी आधारित प्रवेश नियंत्रण प्रणाली उभारण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. बाहेरील राज्यातून येणाऱ्या सर्व कामगारांची चारित्र्य पडताळणी तातडीने पूर्ण करून त्याची माहिती स्थानिक पोलिसांना देणे उद्योगांना बंधनकारक राहील. महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी रात्रीच्या शिफ्टमध्ये विशेष पोलीस गस्त ठेवली जाईल आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्वरित एफआयआर नोंदवला जाईल. औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमणे हटवण्यासाठी पोलीस आणि संबंधित प्रशासन संयुक्त मोहीम राबवणार असून सायबर गुन्हे, अमली पदार्थविरोधी मोहीम आणि सणासुदीच्या काळातील खंडणीच्या तक्रारींवर कडक कारवाई केली जाईल. उद्योगांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी आता दर महिन्याला ही समन्वय बैठक घेतली जाईल, असे आश्वासन पोलीस अधीक्षकांनी दिले. तसेच शेंद्रा औद्योगिक क्षेत्रासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याचा प्रस्ताव पाठवण्यासंदर्भात त्यांनी सकारात्मकता दर्शवली. उपस्थित सर्व उद्योजकांनी पोलीस प्रशासनाच्या या उद्योगपूरक आणि विकासाभिमुख भूमिकेचे स्वागत करत पोलिसांना पूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली. या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी मा. पूजा नांगरे, विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, डीएमआयसीचे व्यवस्थापक अरुण दुबे, मसिआचे अध्यक्ष गजानन पी. देशमुख, मिलिंद पाटील, शैलेश ढाबेकर, राहुल मोगले आणि इतर मान्यवर उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## शाखा अधिकाऱ्यानेच सोसायटीच्या मारला दहा लाखवर डल्ला

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** एडवोकेट मल्टीस्टेट पर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड शाखा परभणी मध्ये आर्थिक अनियमित्यतें चा कळस गाटला आहे. आणि चक्क शाखा अधिकारी यांनी सोसायटीच्या रक्कमे वर मारला डल्ला सदरील सोसायटीची रक्कम बँकेतील सोसायटीच्या खात्यामध्ये जमा न करतात अपहरण करत सोसायटीची फसवणूक केली आहे दहा लाख बावीस हजार दोनशे सत्तर रुपयाची फसवणूक केल्याप्रकरणी शाखा अधिकारी वर दोन जुलै रोजी नवा मोंढा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

अधिक माहिती अशी की मनोज गंगाधरराव जोशी यांनी फिर्याद दिली आहे. संपूर्ण महाराष्ट्र शाखा आहेत. वकिलांच्या सेवेसाठी च ही शाखा परभणी येथे 2013मध्ये स्थापन करण्यात आली असून या शाखेत शाखा अधिकारी व्यवहार करत असल्याबाबत अध्यक्षांना माहिती मिळाली त्या माहितीच्या आधारे अध्यक्षांनी फिर्यादीला शाखेतील आर्थिक व्यवहाराची तपासणी करण्याविषयी सूचना दिल्या.

सोसायटीचे शाखा अधिकारी अतुल काशिनाथराव कासंडे यांनी एक एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या दरम्यान सोसायटीमधील जमा असलेली रोख रक्कम नऊ लाख 92 हजार व नॉन जुडीशियल स्टॅम्प पेपर रक्कम 52 हजार 600, कोर्ट लेबल्स रक्कम 57670. अशी एकूण दहा लाख 22 हजार 270 रुपयांचे रक्कम सोसायटीच्या बँक खात्यात जमा न करताच व सोसायटीने दिले जादरी पार न पडता रकमेचा आर्थिक अपहर करून सोसायटीची फसवणूक केली. या प्रकरणी शाखा अधिकारी अतुल काशिनाथ कासंडे यांच्या नवा मुंडा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

## पुनरिक्षण मोहिमेला गती; तहसीलदार यांनी बीएलओंच्या कामकाजाची केली प्रत्यक्ष पाहणी



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत ९६-परभणी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालय परभणीच्या वतीने प्रत्यक्ष क्षेत्रभेटी घेण्यात आल्या. तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. संदीप राजपुरे, सहाय्यक महसूल अधिकारी मदन चव्हाण तसेच निवडणूक विभागाचे ऑपरेटर बाळासाहेब साळवे यांनी दिनांक ४ जुलै २०२६ रोजी परभणी शहरातील विविध मतदान केंद्र क्षेत्रांना भेट देऊन BLO यांच्याकडून सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी BLO यांना प्रत्यक्ष क्षेत्रस्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी व समस्यांची माहिती घेण्यात आली. तसेच मतदार यादी पुनरिक्षणाशी संबंधित विविध बाबींवर आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. कामकाजात येणाऱ्या अडचणींवर तात्काळ उपाययोजना सुचवून विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे काम निर्धारित वेळेत, अचूक व प्रभावीपणे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मतदार यादी अधिकाधिक अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वयाने कार्य करून निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही : प्रकाश आबिटकर

### 108-102 रेफरलची चौकशी; संस्थात्मक प्रसूतींवर भर, दोषींवर कारवाईचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.

मंत्रालयातील समिती कक्षात झालेल्या बैठकीत आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व



जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बैठकीत आबिटकर यांनी सांगितले की, १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. मात्र काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांकडे पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे मागील सहा महिन्यांतील रेफरलचा डेटा तपासून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी नमूद केले. रुग्णांना अनावश्यकपणे खासगी रुग्णालयांकडे पाठविल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित केली जाईल. यासाठी सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

शासकीय आरोग्य संस्थांमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहण्यासाठी नियमित देखरेख ठेवण्याचे निर्देश देतानाच शासनाकडून आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही निष्काळजीपणा अथवा दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

'आरोग्य संवाद यात्रा'अंतर्गत १५ जूनपासून राज्यभर उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि गावपातळीवरील आरोग्य समित्यांची प्रत्यक्ष पाहणी सुरू असून, त्यामध्ये आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाणार आहे. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवून कालबाह्य समित्या तातडीने पुनर्गठित कराव्यात. विद्यमान सरपंच आणि सदस्यांचा समावेश करून समित्यांचे नियमित कामकाज सुरू ठेवण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असल्याचे आबिटकर यांनी स्पष्ट केले. तसेच दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची उपस्थिती बंधनकारक राहील, असेही त्यांनी सांगितले.

## एसटी पाससाठी विद्यार्थ्यांना माराव्या लागतात हेलपाटा; कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा





**सिल्लोड :** बस स्थानकावर शैक्षणिक पाससाठी विधार्थी रंगेत उभे राहिले. 11.00 वाजले तरीही साहेब अतापर्यंत आले नाही. उशिरा आल्यानंतर जेवणाची वेळ होते. असे करत पास बनवण्यासाठी विद्यार्थ्यांना दोन ते तीन दिवस लागतात. कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## 'सहकारातून समृद्धीकडे' सहकार संवाद मेळावा उत्साहात; युवकांना सहकारातील संधींचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, दि. ४ :** केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सहकार भारती, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था, छत्रपती संभाजीनगर सहकार विभाग आणि ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "सहकारातून समृद्धीकडे" या संकल्पनेवर आधारित सहकार संवाद मेळावा उत्साहात पार पडला.

युवकांमध्ये सहकार चळवळीबाबत जागरूकता निर्माण करणे, सहकार क्षेत्रातील रोजगार व उद्योजकतेच्या संधींची माहिती देणे आणि सहकार संवाद अधिक व्यापक करणे हा या मेळाव्याचा उद्देश होता. यावेळी "सहकारातील संधी" या विषयावर मार्गदर्शनपर संवाद



आयोजित करण्यात आला.

मेळाव्याला विभागीय सहनिबंधक (सहकार) संतोष बिडवई, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) समृत जाधव, वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था संघाचे उपाध्यक्ष शांतीलाल शिंगी आणि किशोर चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी सहकार क्षेत्रातील बदलती परिस्थिती, युवकांसाठी उपलब्ध संधी आणि सहकार चळवळीच्या बळकटीसाठी सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऑडिट सह प्रकोष्ठ, महाराष्ट्र राज्य सहकार भारतीचे आबासाहेब देशमुख यांनी केले.

यावेळी सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे प्रदेश सचिव सुनील मोटलग, सहकार भारती छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय प्रमुख संभाजी राचुरे, ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशनचे विभागीय अध्यक्ष संजय वाणी तसेच सिद्धनाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व नियोजन समिती प्रमुख रामेश्वर मानकापे यांच्यासह विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. मेळाव्यात सहकार क्षेत्रातील विविध संधी, युवकांचा सहभाग आणि सहकार चळवळीचे भवितव्य यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थितांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## 'स्क्रीन'मध्ये बालपण कैद; मोबाईलमुळे मुलांना जडताहेत अनेक शारीरिक व मानसिक रोग

हिंदू प्रकाशवार्ता/ सय्यद जमीरोद्दीन

**अजिंठा :** ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांपासून ते शहरातील अलिशान सोसायट्यांपर्यंत, लहान मुलांचे विश्व आता स्मार्टफोनच्या स्क्रीनमध्ये कैद झाले आहे. केवळ मोबाईल गेम्सच नव्हे, तर 'एआय आणि 'रिल्स'च्या इन्फ्लुएन्स' अतिवापरामुळे मुलांच्या मेंदूवर होणारे परिणाम आता कायमस्वरूपी मानसिक विकारांचे रूप घेत असल्याचे धक्कादायक निरीक्षण तज्ज्ञांनी नोंदवले आहे. ग्रामीण भागात जिथे मुले मैदानावर असायला आठ हवीत, तिथे ती आता कोपऱ्यात बसून 'रिल्स' बनवण्यात किंवा पाहण्यात



> **काही वर्षांपासून आम्ही पालकांना मोबाईल पासून मुलांना दूर ठेवा हा सल्ला देत आहे, पण आज २०२६ मध्ये परिस्थिती हाताबाहेर जात आहे. मुलांमध्ये 'डोपामाईन 'ची पातळी एवढी वाढली आहे की, साध्या खेळात किंवा अभ्यासात त्यांना आनंद मिळेनासा झाला आहे. मुले आता पालकांवर हात उचलण्यापर्यंत किंवा स्वतःला इजा करून घेण्यापर्यंत आक्रमक होत आहेत. हा केवळ हट्टीपणा नाही, तर हे एक गंभीर 'डिजिटल व्यसन' आहे.'**
>
> **- डॉ. रशीद शेख**

व्यस्त आहेत. दुसरीकडे, शहरातील फ्लॅट संस्कृतीत मुले एआय चॅटबॉट्सशी संवाद साधत असून, प्रत्यक्ष माणसांपेक्षा त्यांना आभासी मित्र अधिक जवळचे वाटू लागले आहेत. ज्या वयात मुलांना मैदानी खेळ खेळणे गरजेचे आहे त्या वयात मुले एका जागी बसून मोबाईल पाहण्यात दंग असल्याने मुलांना अनेक शारीरिक जित आणि मानसिक रोग जडत आहेत. हे भविष्याच्या दृष्टीने सर्वांसाठीच धोक्याचे आहे.

पालकांनो, आता तरी जागे व्हा!!

केवळ मोबाईल हिसकावून उपाय होणार नाही तर 'डिजिटल पॅरेंटिंग' स्वीकारावे लागेल. दररोज किमान एक तास 'नो गॅझेट अवर' पाळणे, मुलांन निसर्गाच्या सान्निध्यात नेणे आणि त्यांच्याशी संवाद साधण हाच यावरचा सर्वोत्तम उपाय आहे. तंत्रज्ञान ही गरज असल तरी, ते मुलांचे बालपण हिरावून घेत असेल, तर ते मुलांसाठी 'धोकादायक' ठरत आहे, हे पालकांनी लक्षात घेणे गरजेच आहे.

**धोक्याची लक्षणे आणि शारीरिक परिणाम :** तज्ज्ञांच्या मते, अतिवापरामुळे मोबाईलच्या मुलांमध्ये स्मरणशक्ती कमी होण्याचे प्रकार वाढले आहेत. मान झुकवून सतत मोबाईल पाहिल्याने 'टेक्स्ट नेक सिंड्रोम' आणि डोळ्यांचे गंभीर विकार जडत आहेत. या व्यतिरिक्त, मैदानी खेळांच्या अभावामुळे शहरी व ग्रामीण दोन्ही भागातील मुलांमध्ये लठ्ठपणा आणि चिडचिडेपणाचे प्रमाण ३० टक्क्यांनी वाढले आहे.

## जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला 'सहकार सेवा पुरस्कार' प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये शनिवारी आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'सहकार सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. संघाचे अध्यक्ष गोकुळसिंग राजपुत यांच्या वतीने संघाचे



व्यवस्थापकीय संचालक सुरेश पहाडिया यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी लेखाधिकारी गणेश धोत्रे व दूध संकलन अधिकारी कुणाल राठोड उपस्थित होते.

दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने राबविण्यात येणारे विविध उपक्रम, गुणवत्तापूर्ण सेवा, पारदर्शक प्रशासन, शेतकरीकेंद्रित धोरणे तसेच सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

या सन्मानामुळे संघाच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेतली गेली असून, संघाच्या पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## घाटीत बायोमेट्रिक हजेरीची सक्ती; निवासी डॉक्टरांना 8 तासांची ड्युटी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे शुक्रवारी झालेल्या महाविद्यालय परिषद (कॉलेज कौन्सिल) बैठकीत रुग्णसेवा, कर्मचारी शिस्त आणि प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय कर्करोग रुग्णालयाच्या सभागृहात ही बैठक पार पडली. पुढील बैठक १० जुलै रोजी एसएसबी रुग्णालयात होणार आहे.



याशिवाय, सर्व डॉक्टरांनी सकाळी वेळेत कर्तव्यावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. सकाळी १०.३० वाजेपर्यंत हजर न राहणाऱ्या डॉक्टरांकडून लेखी खुलासा मागविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

बैठकीस अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, उपअधिष्ठाता डॉ. काशिनाथ गर्कळ, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. विनोद मुंदडा, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. मिर्झा सिराज बेग, डॉ. भारत सोनवणे, डॉ. अर्चना राठोड-पवार, डॉ. अंजली दहिफळे, वैद्यकीय अधीक्षक सुचिता जोशी, डॉ. दर्पण जक्कल तसेच विविध विभागांचे प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## लाडगाव येथे 'विकसित भारत- गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण)' योजनेचा शुभारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर अंतर्गत आदर्श ग्रामपंचायत लाडगाव येथे 'विकसित भारत- गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण)' (VB-G RAM G) योजनेचा शुभारंभ पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या साधना कुलकर्णी, पंचायत समिती सदस्य शेखर दांडगे, शिवाजी पळसकर,



विठ्ठल कोरडे, चारुशीला गावंडे, गटविकास अधिकारी शिवाजीराव साळुंके यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात VB-G RAM G योजनेची उद्दिष्टे, अंमलबजावणीची पद्धत आणि मनरेगा योजनेच्या तुलनेत झालेले बदल याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, कृषी उत्पादकता वाढविणे आणि ग्रामीण नागरिकांना अधिक प्रभावी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या योजनेअंतर्गत वर्षाला किमान १२५ दिवस रोजगाराची हमी, केंद्र व राज्य शासनाचा ६०/४० निधी वाटा, शेतीच्या पेरणी व कापणी हंगामात ६० दिवसांचा कायदेशीर विराम तसेच डिजिटल पद्धतीने कामांचे नियोजन अशा महत्त्वाच्या तरतुदींची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थितांनी विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्याची प्रतिज्ञा घेतली. तसेच दोन मजुरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी अधिकारी जाधव, अधापुरे तसेच पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री गजानन बागल, ग्रामपंचायत अधिकारी चव्हाण तसेच VB-G RAM G कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911